महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड
"प्रकाशगड", ५वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई ‍‍‍‍‍‍इ ४०० ०५१
दूरध्वनी : २३४७ ८७४७, २६४७ ४२११
फॅक्स : ०२२-२६४७ ५०१२
E-mail:cepp@mahadiscom.in, Webside : www.mahadicom.in

**: जाहीर सुचना :**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित आणि मे. लॅन्को एनर्जी प्रा.लि. यांमधील दीर्घ काल वीज खरेदी करारास मंजुरी संबंधाने सूचना/अभिप्राय मागिवत आहेत.**

**(प्र.क्र. २७/२००६)**

१. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) यांनी सिक्कीम राज्यात विकसित करण्यात यावयाचा तीस्ता जल विद्युत प्रकल्प (टप्पा क्र.सहा) यामधून ५०० मे.वॉ. एवढी विक्रीयोग्य वीज खरेदी करण्यासाठी मे. लॅन्को एनर्जी प्रा.लि. यांच्याबरोबर करावयाच्या दीर्घ कालीन वीज खरेदी करारास मंजुरी मिळावी याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्याकडे ३० ऑगस्ट २००६ रोजी याचिका दाखल केली आहे.

२. महावितरण यांनी वीज खरेदी कराराच्या मसुद्यासहीत दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र राज्यातील अधिकृत ग्राहक प्रतिनिधी, निरनिराळे जोखीमधारक (ग्राहकांसहित) आणि सर्वसामान्य जनता यांच्याकडून हरकती, अभिप्राय व सूचना मागवाव्यात असे आदेश आयोगाने महावितरण यांना दिले आहेत.

स्वारस्य असलेल्यांनी याचिकेवरील सूचना, अभिप्राय यांच्या सहा प्रती (पाठविण्याचे संपूर्ण नाव, डाक पत्ता, पिन कोड क्रमांक व असल्यास इ-मेल पत्ता, त्यांवर नमूद करून) आयोगाचे सचिव यांना ६ जानेवारी २००७ पर्यंत पोहोचतील अशा बेताने समक्ष, किंवा डाकेने अथवा फॅक्स/इ-मेल द्वारे पाठवाव्यात व एक प्रत संचालक (संचालन) म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ६वा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना पाठवावी. अभिप्राय, सूचना एखाद्या संघटनेच्या किंवा ग्राहक गटाच्या वतीने करण्यात येत असल्यास आणि आयोगापुढील सुनावणीस जातीने उपस्थित राहण्याची इच्छा असल्यास तसे नमूद करावे. इच्छुक व्यक्तींना पुढे नमूद केलेल्या वेळी व स्थळी आयोजित केलेल्या सार्वजनिक सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात येईल व त्यासाठी वेगळी सूचना दिली जाणार नाही.

३. सार्वजनिक सुनावणी दिनांक ९ जानेवारी २००७ रोजी सकाळी ११.०० वाजता व्हिस्टा हॉल, तिसावा मजला, सेंटर क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५ येथे घेण्यात येईल.

४. वीज खरेदी करार व कार्यवाही सारांश यांचा समावेश असलेल्या याचिकेच्या प्रती (प्रत्येक प्रतीस रू. २५/- किंमतीने) मुख्य कार्यालय व परिमंडल कार्यालये येथे, ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून एका आठवड्यात उपलब्ध करून द्याव्यात, त्याचप्रमाणे, याचिकेतील मजकूर विनामूल्य डाऊनलोड करून घेण्यासाठी वेबसाईटवरही प्रकाशित करावी असे निर्देश महावितरण यांना देण्यात आले आहेत.

दिनांक :

मुंबई

नाव : द. सं. कदम

पदनाम : कार्यकारी संचालक-१

म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्या.

Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com

**वृत्तपत्राचे नावे**

| अनु.क्र. | वृत्तपत्रांची नाव | | | प्रकाशनाची भाषा |
|---|---|---|---|---|
| १. | टाइम्स ऑफ इंडिया | ) | | इंग्रजी |
| २. | इंडियान एक्सप्रेस | ) | | इंग्रजी |
| ३. | हिंदुस्थान टाइम्स | ) | महाराष्ट्रातील सर्व | इंग्रजी |
| ४. | महाराष्ट्र टाइम्स | ) | ठिकाणच्या आवृत्त्या | मराठी |
| ५. | लोकसत्ता | ) | | मराठी |
| ६. | सकाळ | ) | | मराठी |

Document Produced by deskPDF Unregistered :: http://www.docudesk.com